महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
CIN : U40100MH2005SGC153649

जा.क्र. औसंवि/ब/जीवनविमा/**१६८८९** दिनांक : **१४/१०/२०२०**

# परिपत्रक

**विषय :** म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कं. मर्या. व महावितरण या कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना **दि.०७/१०/२०२० ते दि.०६/१०/२०२१** या कालावधी करीता **"गट मुदत जीवन विमा योजना" (Gr.Term Insurance Policy)** लागू करणेबाबत.

*********

म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या., महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या कंपन्यांमधील वेतन पुनर्निधारण करार व्यवस्थापन व संघटना प्रतिनिधी यांच्यामध्ये दि.११.०९.२०१९ रोजी करण्यात आला. सदर करारातील मुद्दा क्र.१० मधील (१०.२) नुसार कंपन्यातील कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी रु.२० लाख रक्कमेची गट मुदत जीवन विमा योजना नव्याने लागू करण्याकरीता सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार चारही कंपन्यातील कर्मचाऱ्यांना गट मुदत जीवन विमा योजना (Group Term Insurance Policy) सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता.

मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या., यांनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महानिर्मिती व महापारेषण तसेच संचालक (वित्त), म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या.,व संचालक (वित्त) महावितरण, महानिर्मिती व महापारेषण आणि संचालक (मासं), महावितरण व कार्यकारी संचालक (मासं) महानिर्मिती व महापारेषण यांचेशी विचारविनिमय करुन चारही कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना **दि.०७/१०/२०२० ते दि.०६/१०/२०२१** या कालावधी करीता M/S.India First Life Insurance Company Ltd. यांच्या मार्फत **"गट मुदत जीवन विमा योजना"** (Group Term Insurance Policy) लागू करणेबाबत मंजुरी दिली आहे.

**गट मुदत जीवन विमा योजनेची (Group Term Insurance Policy) ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.**

१. सदर योजना गट मुदत जीवन विमा योजना (Group Term Insurance Policy) म्हणून India First Life Insurance Company Ltd. यांच्या मार्फत कार्यान्वित होईल. या योजनेस MSEB HCL & Group Companies (MSEDCL, MSPGCL & MSETCL) असे संबोधण्यात येईल.

२. या गट मुदत जीवन विमा योजनेचा (Group Term Insurance Policy) **क्रमांक - G0001030** असुन त्याची मुळ राशीभुत जीवन विमा रक्कम रु.२०,००,०००/- (रु. वीस लाख) प्रति कर्मचारी राहील.
३. या योजनेचा कालावधी दि.०७.१०.२०२० ते दि.०६.१०.२०२१ पर्यंत राहील.
४. विमा योजनेच्या उपरोक्त कालावधीमध्ये कर्मचाऱ्याचा कुठल्याही कारणाने दुर्देवाने मृत्यु झाल्यास, विमा कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून रु.२० लाख राशीभुत विमा रक्कम मृत कर्मचाऱ्याच्या वारस असलेल्या अवलंबिताच्या बँक खात्यामध्ये अदा करण्यात येईल.
५. म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या. व महावितरण या कंपन्यांमधील कार्यरत कर्मचारी या योजनेच्या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होऊन त्याचा दुदैवाने मृत्यू झाला, तरीही सदर योजनेच्या कालावधीत दि.०६.१०.२०२१ पर्यंत तो पात्र राहील.
६. सदर गट मुदत जीवन विमा योजनेकरीता (Group Term Insurance Policy) विमा हप्ता प्रति कर्मचारी रु.९,०००/- व वस्तु व सेवा कर (GST) रु.१६२०/- असा एकूण प्रति कर्मचारी रु.१०,६२०/- (GST सह) कंपन्यांमार्फत विमा कंपनीस अदा करण्यात आलेला आहे.
७. सदर योजनेसाठी म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या. व महावितरण या कंपन्यांमधील नियमित कर्मचारी तसेच महावितरण मधील सर्व सहाय्यक कर्मचारी व प्रशिक्षणार्थी पदवी व पदवीधर अभियंते हे पात्र राहतील.

**गट मुदत जीवन विमा योजनेअंतर्गत (Group Term Insurance Policy) दावा दाखल करण्यासाठी करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणे -**

१. मृत कर्मचाऱ्याच्या वारसाने कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यानंतर योग्य त्या कागदपत्रांसह विमा कंपनीस कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्याची सुचना तातडीने **(मृत्यु झाल्यापासून ३० दिवसाच्या आत)** ई-मेलद्वारे अथवा कुरिअर द्वारे द्यावी. (Email- claims.support@indiafirstlife.com) यावर द्यावी.
२. या योजनेतंर्गत दावा दाखल करण्यासाठी असलेला विहीत नमुन्यातील फॉर्म पुर्णपणे भरुन त्यासोबत खालील कागदपत्रे जोडावीत. (दावा दाखल करण्यासाठीचा विहीत नमुन्यातील फॉर्म सोबत जोडला आहे.)
    अ. कर्मचाऱ्याचा मृत्यु दाखला.
    ब. कर्मचाऱ्याच्या वारसाचे आधार कार्ड व पॅन कार्ड.
    क. वारसाच्या बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश अथवा बँकेच्या पासबुकची छायांकित प्रत.
    ड. अनैसर्गिक मृत्यु असल्यास अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेला शवविच्छेदनाचा अहवाल.

३. वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार मृत कर्मचाऱ्याच्या वारसाने गट मुदत जीवन विमा योजनेसंदर्भातील दाव्यांची योग्य ती कागदपत्रे मृत कर्मचाऱ्याचे वेतन ज्या कार्यालयातून अहरित व वितरित (Drawing & Disbursement) करण्यात येत होते, अशा कार्यालयामध्ये जमा करावे व त्याची प्रत **India First Life Insurance Company Ltd.** यांना ई-मेलद्वारे (claims.support@indiafirstlife.com) पाठवावी.

४. संबंधित कार्यालय प्रमुखाने मृत कर्मचाऱ्याच्या वारसांकडून प्राप्त झालेल्या गट मुदत जीवन विमा योजनेचा प्रस्ताव तातडीने २ दिवसामध्ये **India First Life Insurance Company Ltd.** यांना खालील पत्त्यावर पाठवावा. तसेच सदर प्रस्ताव ई-मेल द्वारे claims.support@indiafirstlife.com यांना पाठवून त्याची प्रत मृत कर्मचाऱ्याच्या वारसास व संबंधित कंपनीच्या मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांना पाठवावी. सदर ई-मेलची प्रत संबंधित परिमंडळाच्या उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना देखील ई-मेलद्वारे पाठवावी.

**गट मुदत जीवन विमा योजनेअंतर्गत** India First Life Insurance Company Ltd. **यांचेकडे दावा दाखल करण्यासाठीचा पत्ता -**

**India First Life Insurance Company Ltd.,**
**12th & 13th floor, North (C) Wing,**
**Tower 4, Nesco IT Park,**
**Nesco Centre, Western Express Highway,**
**Goregaon (E) , Mumbai - 400063.**

**Tel.No.022 61658700**
**E-Mail- claims.support@indiafirstlife.com**

या योजनेसंदर्भातील दाव्याबाबत व सहाय्यासाठी विमा कंपनीकडून खालील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**Leval 1 : Mrs Kiran Bhatt – Senior Manager Claims**
**Email Id : kiranbhatt@indiafirstlife.com**
**Contact : 022 6857 0672**

**Leval 2 : Mr.Anand Rajan – Head Claims**
**Email Id : anand.rajan@indiafristlife.com**
**Contact : 022 6857 0612**

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या E-Liberary व Employee Portal वरील Circular (I.R. Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

सोबत : दावा दाखल करण्यासाठीचा विहीत नमूना फॉर्म

**(संजय रा. ढोके )**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**